Impact Factor – 6.625 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**International Multidisciplinary E-Research Journal**

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February -2020 Special Issue – 224 (B)

## RELEVANCE OF GANDHIAN THOUGHTS

**Guest Editor**
Dr. Mrs. M. V. Waykole
Principal,
Bhusawal Arts, Science and P.O. Nahata
Commerce college, Bhusawal, Dist Jalgaon.

**Executive Editor**
Dr. A. D. Goswami
Vice Principal,
Bhusawal Arts, Science and P.O. Nahata
Commerce college, Bhusawal, Dist Jalgaon.

**Chief Editor**
Dr. Dhanraj T. Dhangar (Yeola)

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 800/-

| | | | |
|---|---|---|---|
| 33 | महात्मा गांधीजींच्या समग्र तत्त्वज्ञानाची भारताच्या विकासासाठी गरज व आजची वास्तवता | डॉ. संजय भोळे | 127 |
| 34 | महात्मा गांधींचा आर्थिक दृष्टीकोन | प्रा. जितेंद्र आडोकार | 132 |
| 35 | महात्मा गांधी : एक महान सृजनशील व्यक्तिमत्त्व | डॉ. तुकाराम बोकारे | 135 |
| 36 | महात्मा गांधींचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान | प्रा. जी. एम. घुटे | 139 |
| 37 | महात्मा गांधींचे नैतिकतेसंबंधी विचार | डॉ. डी. डी. राठोड | 143 |
| 38 | महात्मा गांधीजी व त्यांची ग्राम विकासाची संकल्पना | साहेब पडलवार | 146 |
| 39 | महात्मा गांधींचे शैक्षणिक विचार | डॉ. आशालता जावळे | 151 |
| 40 | महात्मा गांधींचे तत्त्वज्ञान – जागतिक शांततेतील अहिंसेची भूमिका | डॉ. दिलीपसिंह निकुंभ | 154 |
| 41 | पूर्वखानदेश जिल्ह्यात महात्मा गांधी जयंती उत्सव (१९२९-१९४२) | डॉ. दिनेश महाजन | 157 |
| 42 | मराठी कादंबरीतील गांधी विचारांचा प्रभाव : एक शोध | डॉ. रविंद्र नागराळे | 161 |
| 43 | महात्मा गांधींचे आर्थिक आणि सामाजिक स्थितीविषयक विचार | डॉ. डी. एस. शहापुरे | 164 |
| 44 | महात्मा गांधी आणि समाजकार्याचे तत्त्वज्ञान | डॉ. नितीन बडगुजर | 171 |
| 45 | महात्मा गांधीचे महिला विषयक विचार | प्रा. यादव बोयेवार | 174 |
| 46 | अस्पृश्यता निवारणाबाबत महात्मा गांधीचे विचार | डॉ. भारती गायकवाड | 177 |
| 47 | ७३ वी घटनादुरुस्ती आणि महिला सबलीकरण | डॉ. विजय तुंटे, रागुनाथ सोनवणे | 181 |
| 48 | गांधी विचार | प्रा. ए. पी. पाटील | 183 |
| 49 | महात्मा गांधींची मुलोद्योगी शिक्षण योजना | डॉ. शंकर धनवडे | 186 |
| 50 | महात्मा गांधी यांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान | प्रा. किशोर भोळे | 190 |
| 51 | खेड्या कडे चला...ची हाक | डॉ. बाजीराव पाटील | 194 |
| 52 | ग्रामीण विकासातील महात्मा गांधींच्या विचारांची प्रासंगिकता | डी. एच. कोळी | 196 |
| 53 | गांधी विचार आणि मराठी साहित्य | डॉ. दिपक सूर्यवंशी | 200 |


RESEARCHJOURNEY

या अंकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी राखून ठेवलेले आहेत. प्रकाशकांच्या पूर्वपरवानगीशिवाय या अंकातील लेखांचे पुनर्प्रकाशन करता येणार नाही. या अंकात व्यक्त झालेली मते व विचार हे त्या लेखाच्या लेखकांचे वैयक्तिक विचार आहेत त्याच्याशी संपादक किंवा प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. लेखांच्या मूळ मालकी हक्कासंदाभातील संपूर्ण जबाबदारी लेखाच्या लेखकांची असेल.

- मुख्य संपादक, रिसर्च जर्नी

**Published by –**

© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan Intern...
Email : swatidhanrajs@gmail.com Websit...

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625,
Special Issue 224 (B) : Relevance of Gandhian Thoughts
Peer Reviewed Journal
ISSN : 2348-7143
February-2020

# महात्मा गांधीजीं व त्यांची ग्राम विकासाची संकल्पना

साहेब विश्वनाथराव पडलवार
सहा. प्राध्यापक,
ज.जि म वि प्र स समाजाचे, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जळगाव.
९८५०५६०५२७,padalwarsaheb@gmail.com

महाराष्ट्राला अत्यंत गौरवशाली व भक्कम सांस्कृतिक परंपरा लाभली आहे. स्वातंत्र्यलढा, धर्मसुधारणा चळवळ, सामाजिकन्यायाच्या लढा या सर्व बाबतीत महाराष्ट्र आघाडीवर राहिला आहे. आज महाराष्ट्रराज्याची स्थापना होऊन ५५ वर्षे झालेली आहेत. या काळात अनेक सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय स्थित्यंतरे झाली. पंचवार्षिक योजना आल्या. ग्रामीण भागातून शहराकडे स्थलांतराचे प्रमाण वाढले. सर्वसामान्य लोकांचा राजकारणातील सहभाग वाढीस लागला. ब्रिटिशांनी ग्रामीण विकासाकडे दुर्लक्ष केले. केवळ वसाहतवादी व्यवस्थेला पूरक विकास केला. ग्रामीणभागातील प्रमुख व्यवसाय शेती असल्यामुळे शेतीसुधारणेकडे जास्त प्रमाणात लक्ष दिले गेले नाही. हे लक्षात घेऊन म.गांधींनी राज्याच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय शक्ती साकारता येतील अशी ग्रामस्वराज्याची कल्पना मांडली. राष्ट्राचा विकास आणि समृद्धी याबाबी खेड्याच्या विकासावर अवलंबूनअसतात, हे महात्मा गांधीजींनी ओळखले होते. किंबहुना भारताची ओळख ही शहरापेक्षा येथेअसलेल्या ८ लाखगावांतूनहोते. भारत हा देश खेड्यात वसलेला आहे. मुळात खेडी ही आमच्या गरजापूर्तीसाठी बनवली गेली आहेत. खरेतर ग्रामीण भाग जर नाहीसा झाला तर भारत देशाची सांस्कृतिक ओळख समाप्त होईल. विश्वातील भारताची पारंपरिक प्रत माहरवून जाईल "ग्रामीणविकासाचा / खेड्यांचा पुनरूद्धारके वळते व्हाच संभवनिय असेल जेव्हा त्याचे शोषण होणार नसेल. "[१]महात्मा गांधीजींचे हे विचार जेव्हा स्वातंत्र्यपूर्व काळात भारतातील ग्रामीण भागाची घडी विस्कटू लागली होती व खेड्यांची स्वयंपूर्णता नष्ट होऊ लागली होती त्या वेळचे आहेत.

भारतातील ग्रामीण विकासाची संकल्पना अनेकांनी भिन्न अंगांनी मांडली आहे. 'गांधीजींनी हिंदयी स्वराज्य' ग्रंथात मांडलेली नैतिक आशयाची घनिष्ठसहचर्य राखणारी आहेप्राप्त परिस्थितीत वाढत्या शहरीकरणामुळे गांधीजींच्या विचारावर मर्यादा येतात. खेडी स्वयंपूर्ण व स्वयंशासित असणे आवश्यक वाटते. त्याचबरोबर खेड्यांचा विकास प्रशासनाशी आवश्यक असलेला संबंध व शहराशी असणारे परावलंबीत्व याशिवाय ग्रामीण विकास शक्य नाही जर प्रत्येक गाव हे स्वावलंबी, स्वयंपूर्ण व शांतताप्रिय झालेतर बाहेरच्या प्रीझमची त्याला आवश्यकता भासणार नाही. ज्या गावात राजसत्ता, अर्थसत्ता व समाजसत्ता यांचे मनोमिलन होईलतेथे ग्रामराज्यच उदयाला येईल यात संदेहनाही; परंतु बदलत्या परिवेशात आज ही कल्पना कालबाह्य ठरली आहे. ग्रामीण विकास हा लोकांच्याद्वारा लोकांसाठीहाती घेतलेला अभिक्रमाचा भाग आहे; परंतुत्यासाठी ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत सामान्य व्यक्तीला विकासाची इच्छाशक्ती व सहभाग असणे महत्त्वाचे आहे

**ग्राम विकासाच्या व्याख्या व अर्थ :**

सर्वसाधारणपणे औद्योगिक क्रांतीनंतर मानवी समाजाची शहरी व ग्रामीण समाज अशी विभागणी झालेली दिसून येते आणि नंतरच्या काळात ग्रामीण विकाससंबंधीची संकल्पना व या बाबतीतले दृष्टिकोनहीहळूहळू बदलत गेले आहेत. खरे तर ग्रामीण विकास या संकल्पनेचा संबंध हा गावाच्या समग्र विकासाशी आहे. त्यामुळेच यासंबंधीच्या प्रस्तुत व्याख्या खालीलप्रमाणे आहेत.

**जी.पार्थसारथी यांच्या मते,**

"ग्रामीण विकासाचा संदर्भ गरिबांचा जीवनस्तर सुधारण्याशी आहे. ग्रामीण विकासाचे चार महत्त्वपूर्ण तत्त्व असतात. ग्रामीण गरिबांची सक्रिय भागीदारी, भौतिक व मानवीय साधनांचा मोठा उपयोग, अर्थसाठा आणि तंत्रज्ञानाचा उपयोग."[२] या व्याख्येतसंसाधनाद्वारे नागरिकांच्या सहकार्याने ग्रामीण जीवनस्तर उंचावणे या बाबींना लेखकाने महत्त्व दिलेले आढळते. अंकर **डेसमंड** यांच्या मते, "ग्रामीण विकास म्हणजे कृषीक्षेत्रात मत्स्यपालन, ग्रामीण उद्योग किंवा हस्तकौशल्य तसेच सामाजिक व

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625,
Special Issue 224 (B) : Relevance of Gandhian Thoughts
Peer Reviewed Journal
ISSN : 2348-7143
February-2020

आर्थिक व्यवस्था निर्माण करण्यासाठी उपलब्ध भौतिक व मानवीय साधनांचा पूर्णपणे उपयोग करून ग्रामीण जनतेचा जीवनस्तर उंचावण्यासाठी स्वीकारली गेलेली व्यूहरचना. भौगोलिक किंवा कार्यक्षेत्र यांचा समावेश होय."[3] यांत्रणांतर्गत विविध व्यवसाय कौशल्याच्याबाबतीने भौतिक विकासाचा विचार केला आहे. जागतिक बँक - "ग्रामीण विकास हा लोकांच्या एका विशिष्ट समूहाच्या (ग्रामीण निर्धन) आर्थिक किंवा सामाजिकसुधारणा करण्यासाठी स्वीकारलेली व्यूहरचना आहे. या व्यूहरचनेत छोटे शेतकरी, कास्तकार किंवा भूमिहीन समूहाला सहभागी केले जाते."[4] जागतिक बँकेची ही व्याख्या सहभागी व क्रियात्मक दृष्टिकोणावर आधारलेली आहे. ज्यामध्ये सामान्य लोकांच्या विकासासाठी मूलभूत साधनांची अपेक्षा केली गेली आहे. वरील व्याख्यांचा परामर्श घेतल्यास असे लक्षात येते की, ग्रामीण विकास हा भारतात प्रदीर्घ कालखंडापासून शहरी भागांच्या तुलनेत अत्यंत अपुरा राहिला आहे. याबाबतीत अनेक विचारवंतातसुध्दा एकमत आहे. अगदी योजनेच्या भाषेत 'ग्रामीण विकास' या संकल्पनेला व्याख्यित करण्यापेक्षा विशिष्ट उद्दिष्टेसमोर ठेवून, ग्राम संकल्पनेत अंतर्भूत होणाऱ्या घटकांनास्पष्ट करणारे पाश्चिमात्य विचारवंत **'हॉवेरो'** यांची व्याख्या सैध्दांतिक वाटते. त्यांच्या मते," योग्य ग्राम विकासामुळे रोजगार, शिक्षण, आहार व आरोग्य, निवास व इतर सामाजिक सुविधा यांच्यासह राहणीमानाच्या पातळीतसुधारणाहोईल."[5] लेखकांच्या मते ग्रामीण क्षेत्रातील उत्पन्नाच्या वितरणातील उत्पन्न व आर्थिकराशी यातील तफावत कमीहोते. उपरोक्तसुधारणांची गतीसातत्यपूर्ण ठेवण्यासाठी ग्रामीण क्षेत्राची क्षमता वाढविणे, ग्रामीण विकासासाठी उपलब्ध संसाधनांचे योग्य नियोजन, संपत्तीचे केंद्रीकरण टाळून उत्पन्नाचेसमन्यायीवाटप करणे आणि या माध्यमातून ग्रामीण भागाची क्षमता वाढविणे आवश्यक असते. अशा प्रकारे ग्रामीण भागातील उपलब्ध साधनांचा उपयोग करून सामान्य लोकांचे राहणीमान व जीवनमानात बदल घडवून आणणे म्हणजेच पर्यायाने ग्रामीण भागाचा विकास झाला असे म्हणता येईल.

**ग्रामीण विकासाबाबत महात्मा गांधीजींचे मत :-**

महात्मा गांधीजे एक भारतीय स्वातंत्र्याने भारावलेले व्यक्तिमत्त्व होते. भारतीय स्वातंत्र्याचे आंदोलन करताना सर्वसमावेशकता जोपासण्याचा त्यांनी सतत प्रयत्न केला. भारतातील सर्व प्रकारच्या विविधता एकत्र करूनत्यांनी स्वातंत्र्याची मांडणी करत असताना विषमतेवर प्रहार केले. प्रसंगी माणसाच्या सुखासाठी सर्व क्षेत्रातील सुविधांचा वापर करावा असेते सांगण्यास विसरले नाहीत. किंबहुना म.गांधी यांनी राजकीय आंदोलनासोबत ग्रामीण अर्थव्यवस्था व समाजाच्या पुर्नरचनेसाठीही काही मूलगामी विचार मांडले आहेत.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस कडे व समाजाचे विश्वस्त म्हणून लोक गांधीजींकडे बघत होते. त्यांनी लोकशाही व कल्याणकारी राज्याचा सतत पाठपुरावा व पुरस्कार केला, ग्रामविकासात स्वायत्त व स्वावलंबन या तत्त्वांना अग्रक्रम दिलेलाहोता. गावच्या आत्मनिर्भरतेसाठी स्वयंपूर्ण ग्राम हीसंकल्पना राबविण्याचा त्यांचा मानस होता. हे विशेष होय. भारतीय खेड्यातील ग्रामसंस्था टिकल्या पाहिजेत. आधुनिक काळातील ग्रामीण समाजव्यवस्था समतेवर आधारित असावी व त्या समाजव्यवस्थेतील उणिवा, मतभेद आपसीसहमतीने दूर केले जावेत यासाठीत्यांनी कसोसीने प्रयत्न केले. म. गांधी यांनी आपल्या **'हिंदस्वराज्य'** पुस्तकात अशा आदर्श ग्रामउद्योगप्रधान भारताची कल्पना विस्तृत केलीहोती की, त्यामध्ये, "ग्राम हा स्वावलंबी व आत्मनिर्भर असा राष्ट्राचा एक महत्त्वपूर्ण भाग असेल." "खेड्यातील परिस्थितीही राष्ट्राच्या स्थितीला प्रतिबिंबीत करते."[5] असेत्यांनी सूचविले होते. एकूणचत्यांनी आपला ग्रामविषयक दृष्टिकोन मांडताना एक अशा आदर्श रामराज्याचो कल्पना केलीहोती की, ज्यात सर्व लोकांना निरोगी व स्वच्छ हवा, आरोग्यमुक्त घरे, गरजा गावातल्या गावातच भागविण्यासाठी ग्रामीण उद्योगांची उपलब्धता, मोकळ्या घरांची रचना ज्यात लोक दैनंदिन लागणाऱ्या भाजीपाल्यांची लागवड व त्यासमवेत पशुधनसंगोपन करू शकतील, आवश्यकतेनुसार पाण्यासाठी विहिरी असतील व गावातील सर्व लोक पाणी काळजीपूर्वक वापरतील. स्वयंपूर्ण ग्रामव्यवस्थेत प्रार्थनास्थळे व मंदिरे, सहकारी स्वरुपाची गोशाला असेल. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणासाठी शाळांची उत्तम व्यवस्था असेल व ज्यात नैतिक शिक्षण आणि औद्योगिक शिक्षण प्राधान्याने दिले जाईल. गावातील प्रश्न गावातच सोडविण्यासाठी पंचायतीची स्थापना करावी. अशी एकूण आदर्श गावाची ही माझी कल्पना आहे."असे ते विशद करतात याबरोबरच भारतातील खेडेही एक वस्ती असून त्याला समृध्द बनविण्यासाठी लोक सहभाग हा विचारही तेवढ्याच

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625,
Special Issue 224 (B) : Relevance of Gandhian Thoughts
Peer Reviewed Journal
ISSN : 2348-7143
February-2020

स्वावलंबी गांधीजींनी मांडला. भारतातील राजकीय व्यवस्थेचा पाया म्हणून पारंपरिक राजकीय पद्धतीची व्यवस्था गांधीजींना ग्रामस्वराज्याच्या माध्यमातून पुनरुज्जीवित करायचीहोती. त्यामुळेत्यांनी ग्रामपंचायत, ग्रामसभा, पाचामुखी परमेश्वर आदि बाबी स्वीकारल्या. याला अनुसरून भारतातील खेडीसमृध्द होण्यासाठीऔद्योगिकरणाच्या ऐवजी ग्रामोद्योग, कुटीरउद्योग यांना प्राधान्य देऊन ग्रामविकासाला चालना देण्याचा हेतू गांधीच्या विचारात होता. मुळातगांधीची विचारधारा गावाच्या आदर्श व संपूर्ण विकासावर आधारलेलीहोती. त्यांच्या मते, "ग्रामस्वराज्य हे आज आपल्या देशाची मोठी आवश्यकता आहे. खेडी जोपर्यंत स्वावलंबी होणार नाहीततोपर्यंत राष्ट्राच्या स्वातंत्र्याला अर्थ उरणार नाही." गांधीजी गावाच्या आर्थिकसमृध्दीसाठी कृषी व ग्रामोद्योगांच्या विकासाचे महत्त्व पटवून देताना खादीची कल्पना मांडतात. त्यांनी चरख्यांना 'जीवनदाता सूर्य' असे संबोधले आहे.[4] ग्रामीण उद्योगातील बलुतेदारी, ग्रामीण कारागिरी, हस्तकला कौशल्य, लघु व कुटीर उद्योगांना प्रोत्साहन देऊन सावकारांवर शोषण थांबविल्यास गावातील संपत्ती गावातच राहील व गाव समृध्द होईलहे गांधीजींनी ओळखलेहोते. म.गांधीजींनी ग्रामीण विकासासाठी 'ग्रामदान'संकल्पना मांडलीहोती. ग्रामदान म्हणजे गावातील प्रत्येक शेतकऱ्याने आपल्या ताब्यातील शेतीही गावास दान करावी. त्यामुळे शेतीही सर्व गावाचीच असेल. ह्या शेतीत प्रत्येकांनीच काम करावे व झालेल्या उत्पादनातून प्रत्येकास समान हिस्सा देण्यात येईल. ह्यामुळे गावाचा विकास झपाट्यानेहोऊन गाव स्वावलंबी बनेल असे त्यांना वाटत होते. म.गांधींनी ग्रामीण विकासासाठी आणखी एक उपाय सांगितला तो म्हणजे प्रत्येक खेडेगावांनी एक दुसऱ्यास सहकार्य करावे. एकमेकांच्या वस्तू खरेदी कराव्यात. त्यांच्या आनंदात व दुःखातही सहभागी व्हावे. ह्या प्रवृत्तीमुळे खेडी द्वेषमुक्त, स्पर्धामुक्त बनून स्वावलंबी होण्यास व ग्रामीण भागाचा कायापालटहोण्यास मदतहोईल. एकंदरीत गांधीजींनी ग्रामस्वराज्य संकल्पनेत एका शोषणविरहित, आर्थिक आणि सामाजिक समानतेवर आधारलेल्या समाजाचे चित्र साकारण्यासाठीत्यांनी विश्वस्त सिध्दांत मांडला. यात त्यांनी राजकीय व सामाजिक विकासाबरोबरच आर्थिक विकासासाठी उत्पन्नाचेसमन्यायी वाटप व यासाठी आर्थिक विकेंद्रीकरणाची आवश्यकता सांगितली. वर्गसंघर्ष टाळूनश्रीमंताकडून गरिबांकडे संपत्तीचेहस्तांतरण व्हावे. धनिकांनीसंपत्तीचे मालक न बनता केवळ विश्वस्ताची भूमिका बजावावी. अतिरिक्त धनाचा उपयोग/वापर हा ग्रामीण गरिबांच्या कल्याणार्थ वापरावा.[5] महात्मा गांधीजींचे ग्रामीण विकासासंबंधी जे विचार होतेते त्या काळात निश्चित उपयोगी पडणारेहोते. काही अपवाद वगळता त्यांच्या ग्रामीण भागासंबंधी असणारा दृष्टिकोन आजही प्रासंगिक व व्यवहार्य आहे. १९४७ पूर्वी भारतात दारिद्र्य, बेकारी, संपत्तीचे निःस्सारण, उपासमार या समस्यांचा विचार केलातर गांधीजींचे ग्रामस्वराज्य, कुटीर उद्योग, लघुउद्योग इ. विषयी विचार योग्य व महत्त्वपूर्ण होते. त्यांनी मांडलेला विचार हा भांडवलशाही शोषण व विषमता आणि साम्यवादातील दमन, हिंसा, पक्षीय हुकूमशाही यांना टाळून मिश्र अर्थव्यवस्था प्रेरित सामाजिक न्यायावर आधारित समाजवादी, समाजरचनेची पायाभरणी करतो. या समाजास ते सर्वोदय समाज असे म्हणतात.[6] यामध्येसंतुलित ग्रामीण विकास रोजगारांचीसंधी, आत्मनिर्भरता व स्वावलंबन यासारख्या अनेक महत्त्वपूर्ण बाबी अंतर्भूत आहेत. **७३ व्या घटनादुरुस्तीनंतर बदलते पंचायतराजचे स्वरूप हे निश्चितपणे गांधीजींच्या ग्रामीण विकास संकल्पनेचेसाकार रूप आहे.** थोडक्यात म. गांधीजींनी सर्वांना सन्मानपूर्वक जगण्याचीसंधी देणारे **'मानव केंद्रीतविकास प्रतिमान'** मांडण्याचा प्रयत्न केला. गांधीजींच्या ग्रामीण विकासात केवळ मानवी कल्याण व मानवी सुखाचा मूलगामी विचार केंद्रीत झालेला असून मूलतः गरीब-श्रीमंत, जमीनदार-मजूर, भिन्न जाती धर्मीय या सर्वांमध्ये जो संघर्ष आहेतो नाहीसा व्हावा असे गांधीजींना मनोमन वाटत होते. म्हणूनच जाती, धर्म व वर्गामध्ये सामंजस्य, परस्पर सद्भाव, ऐक्य निर्माण होण्यासाठी आणि समाजातून शोषणाचे व अन्यायाचेसमूळ उच्चाटनहोण्यासाठी गांधीजींचे विचार आजही वर्तमानकालीन परिस्थितीत महत्त्वपूर्ण ठरतात. संघर्षमुक्त, सौहार्दसहकार्ययुक्त लोकजीवन गांधींना अपेक्षित होते. अलिकडच्या काळातीलतंटामुक्ती अभियान त्यांच्या विचारांचा एक भाग म्हणावा लागेल. म्हणूनच महाराष्ट्रसरकारचा महात्मा गांधीतंटामुक्त अभियान राबविण्याचा निर्णय निश्चितपणे अभिनंदनास पात्र ठरतो. ग्रामीण विकासासाठी पूरकठरतो यात संदेह नाही.

**७३ वी घटनादुरुस्ती ग्राम विकासाच्या दिशेने टाकलेले एक प्रगत पाऊल :**

पंचायतराजसंस्थेला विकासाचे इंजीनसमजले जाते. या इंजिनाला व्यवस्थित चालवायचे असेलतर इंजिनाच्या सर्व भागाची परिपूर्ण माहिती असायला हवी. याकरिता बदलत्या काळातस्थानिक राज्य संस्थेला महत्त्व प्राप्त झाले आहे. ७३ व्या घटनादुरूस्तीमुळे महात्मा गांधी यांनी पाहिलेले ग्रामराज्य हे स्वप्न काही अंशी पूर्णहोताना दिसते.

**७४ वी घटनादुरुस्ती :**

ही घटनादुरुस्ती नागरीस्थानिक स्वराज्य संस्थांशी संबंधित होती.या घटनादुरुस्ती नगरपरिषदांच्या संदर्भात अनेक महत्त्वपूर्ण तरतुदी आढळून येतात. त्या खालीलप्रमाणे आहेत. १) नगरपरिषदांच्या निवडणुकीसाठी प्रौढ मताधिकाराच्या तत्त्वाचा अवलंब २) महिलांसाठी राखीव जागा ३) अनुसुचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यासाठी राखीव जागा ४) नगरपरिषदांचे अधिकार व कामे याचे विवरण ५) नगरपरिषदांच्या निवडणुकासाठी निर्वाचन आयोगाची स्थापना. ६) वित्त आयोगाची स्थापना इ. गोष्टीसंबंधी केलेल्या तरतूदींचा अंतर्भाव होतो."

**ग्रामीण विकासासाठी केंद्र शासनाच्या योजना :**

राष्ट्रपिता म. गांधीजींनी ज्या स्वराज्याचे स्वप्न पाहिलेतेसाकार करण्यासाठी स्वातंत्र्यानंतर पंचायतराज पद्धतीचा स्वीकार करण्यात आला. भारत हा खेडीप्रधान देश आहे. ग्रामव्यवस्था हे आपल्या समाजाचे मुख्य वैशिष्ट्ये आहे. महात्मा गांधींनी भारतातील आदर्श खेड्याची रचना कशी असावी हेस्पष्ट केलेले असलेतरी भारतीय राज्यघटनेच्या कलम ४० प्रमाणे ग्रामस्वराज्याच्या संकल्पनेला मूर्त स्वरूप देण्यात आले.

एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम , पंतप्रधान रोजगार योजना,राष्ट्रीय ग्रामीण रोजगारहमी योजना,प्रधानमंत्री ग्रामसडक योजना.

**ग्रामीण विकास व राज्यशासनाच्या योजना :**

महाराष्ट्र ग्रामीण रोजगारहमी योजना,भारत निर्माण योजना, ग्रामीण निवारा व बारमाही ग्रामीण रस्ते,संत तुकाराम वनग्राम योजना,आदर्श गाव योजना,महात्मा गांधीतंटामुक्त गाव मोहिम योजना.

**निष्कर्ष -**

म.गांधीजीचे ग्रामस्वराज्याचे स्वप्न साकर होण्यासाठी नुसते खेडयाकडे चला असे म्हणून चालणार नाही . तर खेड्यात आज ही जिवंत असलेली जाती व्यस्था, ज्या जाती मुळे अनेकांचे जीवन उध्वस्त झाले आहे. संरजामीवृती , वेठबिगारीची समस्या या सारख्या समस्यांनी अनेक शतक-यानी , शेतमजूरांनी आपले जीवन संपवले आहे. स्त्रियांना मिळणारे दुय्यम स्थान व ग्रामिण भागंत प्रकर्षाने जाणवणारी पुरूष प्रधान संस्कृती यामुळे स्त्रियाच्या विकासाला खिळ बसली आहे .शेकडो वर्षापासून ती त्याच सामाजिक स्थितीत आहे . अशा अनेक पारंपारिक सस्याना नष्ठ करणे गरजेचे आहे. तेंव्हाच म. गांधीजीचा स्वप्नातील स्वयंपूर्ण ग्राम उदयास आणता येईल.त्याच बरोबर खेड्यातील जातीवर आधारीत व्यवसाय जे की व्यक्तीविकासाला मरक आहेत. त्या प्रथा संपविणे गरजेचे आहे. ज्या व्यक्तिीकडे जे कौशल्य आहे तो व्यवसाय करण्यास जर मोकळीक मिळाली तर स्वयंपूर्ण तर होईलच पण जे लोक या समस्यांमुळे गाव सोडून शहरातील बकाल जीवन जगण्यास मजबूर होतात. त्यांचे हे स्थलांतर बंद होईल. नुसतेच जूने ते सोने असे समजून त्यालाच जवळ करण्यापेक्षा नाविण्याची कास धरणे आवश्यक आहे.जातीअंता बरोबरच विज्ञानवादी दृष्टीकोन सृध्दा रुजविण आवश्यक आहे . ग्रामविकासाकरीता बारा बलूतेदारी व्यवस्था मोडून तिथे तंत्रज्ञानाचा स्विकार करून अधूनिक शेती केल्यास म. गांधीजीच्या स्वप्नातील ग्रामविकास घडून येण्यास मदत होईल.जरी म. गांधीच्या नावाने शासनाने अनेक योजनाद्वारे ग्रामविकास करण्याचे योजले असले तरी जो पर्यंत त्या योजनांची अमलबजावणी योग्य त-हेने होणार नाही . तो पर्यंत ग्रामविकास होणे शक्य नाही. जर प्रत्येक योजना ही ग्रामविकास व ग्रामिण भागातील जनतेचा विशेषत: कनिष्ठ जातीचा आर्थिक , सामाजिक, शैक्षणिक , आरोग्यविषयक विकास होणे गरजेचे आहे. ग्रामिण भागातील या कुणब, बलूतेदार, आलूतेदार, कनिष्ठ जाती - जमाती यांचा विकास झाल्यास ग्रामविकासाची " स्वराज्याची " संल्पना उदयास येण्यास वेळ लागणार नाही.

संदर्भ -

१. डॉ.कुकडेकर नरसिंग, घ्माहात्मा गांधीतंटामुक्त गाव मोहीम आणि पोलीस प्रशासनङ, अप्रकाशित पीएच.डी. शोधप्रबंध स्वा.रा.ती.म.वि. नांदेड, जुलै २०१३, पृ.३
२. डॉ.संग्राम मोरे, घ्ग्रामीण विकासाचे राजकारण आणि कॉंग्रेसङ, अरुणा प्रकाशन, लातूर, प्र.आ.२०१०, पृ.क्र.७२
३. कित्ता, पृ.क्र.७२
४. कित्ता, पृ.क्र.७२
५. कित्ता, पृ.क्र.७२
६. डॉ.पंजाब चव्हाण, डॉ.रामचंद्र भिसे (संपादक), घ्गांधी विचारङ, निर्मल प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती २०१०, पृ.क्र.१५७
७. खान एकबाल, घ्पंचायतीराज एवं ग्रामीण विकास योजनाङ, रितू पब्लिकेशन्स, जयपूर, प्रथम संस्करण २००४, पृ.क्र.२५
८. कित्ता, पृ.क्र.२६
९. कित्ता, पृ.क्र.२६
१०. धर्माधिकारी भाऊ, घ्गांधीविचार दर्शन-राजकारणङ, खंड १ म.गांधीस्मारक निधी प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती १९९५, पृ.क्र.७६.
११. प्रा.व्ही.बी. पाटील, घ्पंचायतीराज व नागरीस्थानिक स्वराज्य संस्थाङ, के.सागर पुणे. द्वितीय आवृत्ती २००५, पृ.क्र.३३ .
१२. भारदे बाळासाहेब, घ्गांधी विचारदर्शन-ग्रामस्वराज्यङ, पृथ्वीराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९५.
१३. डॉ.ना.य. डोळे, घ्भारतीय राजकीय विचारवंतङ, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, पहिली आवृत्ती १९९४.
१४. प्रा.दीक्षित राजा, घ्प्राचीन भारत आणि मध्ययुगीन भारताचा इतिहासङ, निराली प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती १९८४.
१५. Sharma L.K. घIndia Social Structure & Changeङ, Rawar Publication, Jaipur, Ed.२००८.

RESEARCH JOURNEY

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.625

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S


# RESEARCH JOURNEY

**International Multidisciplinary E-Research Journal**

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February - 2020 Special Issue – 224 (B)

## RELEVANCE OF GANDHIAN THOUGHTS




**Guest Editor :**
Dr. Mrs. M. V. Waykole
Principal,
Bhusawal Arts, Science and P.O. Nahata
Commerce College, Bhusawal, Dist Jalgaon.

**Executive Editor :**
Dr. A. D. Goswami
Vice Principal,
Bhusawal Arts, Science and P.O. Nahata
Commerce College, Bhusawal, Dist Jalgaon.

**Chief Editor :**
Dr. Dhanraj T. Dhangar
(Yeola)

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS